Aarhat Publication & Aarhat Journal's

# ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

**Peer Reviewed Interdisciplinary Research Journal**

**ISSN- 2277-8721**

Online and Print Journal

**Impact Factor: 5.20 (EduIndex)**

**UGC Approved Journal No - 48833**

[redacted]

Vol VII Issues No IX

**Chief Editor**

Ubale Amol Baban

**Guest Editor**

Prin. Dr. Purandhar Dhanpal Nare

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri.41520

Aarhat Publication & Aarhat Journal's

# ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (EIIRJ)

Peer Reviewed Interdisciplinary Research Journal

ISSN- 2277-8721

Online and Print Journal

Impact Factor: 5.20 (EduIndex)

UGC Approved Journal No - 48833

10th March, 2018

Vol VII Issues No IX

**Chief Editor**

Ubale Amol Baban

**Guest Editor**

Prin. Dr. Purandhar Dhanpal Nare

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad,Dist.Ratnagiri

## INDEX



| Sr.No. | Title | Author Name | Page No |
|---|---|---|---|
| 1 | Power Politics In V.S. Naipaul's 'In A Free State | Dr. Sachin Gundurao Kamble And Mrs. S. J. Velhal | 1 |
| 2 | N. Scott Momaday's House Made Of Dawn: A Blend Of Native And Non Native, Communal Conflict And Resolution | Mr. Jagannath Vitthal Ware | 5 |
| 3 | A Struggle For Freedom In Arvind Adiga's The White Tiger | Laxman Kallappa Sankagol | 9 |
| 4 | Disillusionment In John Braine's 'Room At The Top | Mr. Onkar Dattatray Kulkarni | 12 |
| 5 | Arun Kolatkar's Kala Ghoda Poems: Portrayal Of Subaltern | Vaijayanta Vijay. Patil | 15 |
| 6 | The Predicament Of Women In Githa Hariharan's The Thousand Faces Of Night | Shri. Babu Gopal Patil | 21 |
| 7 | The Treatment Of Ballybeg As A Locale In Brian Friel's Philadelphia, Here I Come!, Translations | Smita Raju Monteiro | 25 |
| 8 | Feminist Approach In Modern Scenario With Reference To Ama Ata Aidoo's Changes: A Love Story | Mr. Udaygiri V. Goswami | 29 |
| 9 | Making English More Friendly With Adaptation | Prof. Anil S. Sugate | 33 |
| 10 | Portrayal Of Social Reality In Mulk Raj Anand's Untouchable | Dr. Namadev P. Khavare | 37 |
| 11 | Study Of Headlines In Print Media | Nilkanth.V. Chakradhari | 41 |
| 12 | Fragmented World Of V. S. Naipaul In 'In A Free State | Dr. S. I. Noorani | 44 |
| 13 | Higher Education: Status And Obstacles In Obtaining Higher Education | Mrs. Shailaja A. Changundi | 48 |
| 14 | Political, Social And Cultural Dimensions In V.S. Naipaul's 'A Bend In The River | Mr. L.N. Shikalgar | 53 |
| 15 | दलित ब्राम्हण : जातीयतेचे दाहक चित्रण | धनपाल कांबळे | 58 |
| 16 | मराठी कादंबरीतील शैक्षणिक क्षेत्राच्या स्थिती गतीचे चित्रण | पाटणकर सौरभ रमेश | 63 |
| 17 | मराठी साहित्यातील भाषा विचार आणि समाज | अजितकुमार पाटील | 68 |





PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science ( 
Mandangad,Dist.Ratnagiri.415203

# 'दलित ब्राह्मण' : जातीयतेचे दाहक चित्रण

धनपाल कांबळे

*लोकनेते गोपीनाथजी मुंडे महाविद्यालय, मंडणगड,जि.रत्नागिरी*

शरणकुमार लिंबाळे यांनी २००४ साली 'दलित ब्राह्मण' या कथासंग्रहाची निर्मिती केली. या कथासंग्रहात 'हरिजन' आणि 'रथयात्रा' या दोन कथासंग्रहातील निवडक व विशेष धाटणीच्या कथा आहेत.यामध्ये एकूण ३१ कथा आहेत. वास्तविक ब्राह्मणी जीवनशैलीचे अनुकरण करणाऱ्या दलितास 'दलित ब्राह्मण' म्हटले जाते. हे नाव प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे. ब्राह्मणीकरण झालेल्या दलितांचे विश्व या कथासंग्रहातील सर्वच कथांत केंद्रस्थानी आहे. पण त्या अर्थाने तशा आशयाच्या या कथासंग्रहातील कथा नाहीत. मात्र प्रत्यक्ष कथेतील वेगवेगळ्या भावविश्वाचे चित्र निश्चित पहायला मिळेल. भारतीय विषमतावादी समाजव्यवस्थेने समाजातील एका विशिष्ट वर्गाला अस्पृश्य समजून त्यांची पशुपेक्षाही हीन अवस्था केली आहे. हीनत्वाच्या केंद्रस्थानी असलेला माणूस त्याला माणूस म्हणून निखळपणे जगता आले पाहिजे, त्याच्यात ती क्षमता आहे, पण या क्षमतेला संधी उपलब्ध होणार नाही. यासाठी प्रयत्नशील असलेला विशिष्ट वर्ग आणि त्यातूनही दलित समाज मनात आणला तर तो काहीही करू शकतो, याची प्रचिती या विविध कथांच्या माध्यमातून शरणकुमार लिंबाळे यांनी दिली आहे. विशेष करून यातील कथा ह्या दलित जीवनजाणिवा असल्याचे दिसतात. याचे कारण मुळात शरणकुमार लिंबाळे हे दलित जातीत जन्माला आल्यामुळे त्यांच्या पाठिशी दलित जीवनाचा प्रत्यक्ष आणि खोलवर अनुभव असल्याने ते कथेशी एकरूप होताना दिसतात. तळागाळातल्या, दीन-दलित समाजातील माणसांच्या स्थितिगतिचे चित्रण त्यांनी आपल्या कथांमधून प्रभावीपणे केले आहे.

जातीयतेचे दाहक जीवनानुभवाचे दर्शन घडविण्याच्या तसेच ते दुःख चव्हाट्यावर मांडण्याच्या उद्देशातूनच दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे असे वाटते. शरणकुमार लिंबाळे यांचा 'दलित ब्राह्मण' हा कथासंग्रह त्याच्या शीर्षकातूनच जातीयतेच्या, अस्पृश्यतेच्या जाणिवेचा निर्देश करतो. या कथासंग्रहातील बहुतांश कथा अस्पृश्यतेचे दर्शन घडविणाऱ्या कथा आहेत. 'हरिजन मास्तर', 'जात', 'नागफणा', 'संबोधी', 'येसकराची भाकर', 'धडका', 'काळोखगर्भ', ''दलित ब्राह्मण', 'गोहत्या', 'युध्द', 'आत्मकथा' या शीर्षकांच्या कथेतून जातीयतेचे, अस्पृश्यतेचे भयावह चित्रण झालेले पहायला मिळते.

अस्पृश्यता म्हणजे भारतीय समाजावरील कलंक असल्याचे अनेकांनी म्हटले आहे. शरणकुमार लिंबाळे यांनी ही अस्पृश्यतेची, जातीयतेची वेदना आपल्या कथांमधून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अस्पृश्यतेचे अत्यंत वस्तुनिष्ठपणे चित्रण करणारी 'हरिजन मास्तर' ही कथा आहे. ब्राह्मण, स्पृश्य, सवर्ण अशा कुलकर्णी गुरूजींना गावात प्रतिष्ठा आहे. पाटलाच्या घरी मानपान आहे. गावात भांडणे पेटविणाऱ्या कपटी कुलकर्णी गुरूजींची प्रवृत्ती कितीही मारक असली तरी त्यांच्या सवर्णपणाखाली ती झाकून जाते. मात्र कुलकर्णी गुरूजींच्या ठिकाणी बदली होऊन आलेल्या हरिजन मास्तरांना गावात कुत्र्या-मांजराइतकीही प्रतिष्ठा मिळत नाही. गावातील सवर्ण समाज त्यांच्याकडे तुच्छतेने पाहतो. आपल्या मुलांना विटाळ होईल म्हणून ते हरिजन मास्तरांच्याकडे शिकायला पाठवत नाहीत. गावातील लोकांची अस्पृश्यांविषयक मानसिकता प्रकट करताना लिंबाळे यांनी 'हरिजन मास्तर' या कथेत निवेदन करतात की, ''मास्तर असला म्हणून काय झालं. शेवटी तो हरिजनच की'' हरिजनांविषयी गावातील सवर्णांची मानसिकता या कथेत दिसून येते. येथे जातीवरून माणसाची किमत केली जाते हे स्पष्ट आहे. गुणवत्ता, बुध्दिमत्ता, कर्तृत्व याहीपेक्षा माणसाची जात श्रेष्ठ प्रचिती या कथेच्या माध्यमातून येते.

'जात' या कथेत हणम्या हा शिक्षित दलित तरूण आहे. तो आपल्या मित्रांपासून जात लपवून ठेवण्याचा सतत प्रयत्न करतो. कथेतील नायक सवर्ण असून जातीभेद न पाळणारा आहे. हणम्याशी त्याची मैत्री आहे. हणम्याला घरी घेऊन जाताना 'धनगर'



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri.415203

बनवून नेतो. नायकाची आई आजारी असताना हणम्या तिला रक्त देण्यास तयार असतो. मात्र नायकाची आई हणम्या खालच्या जातीचा असल्यामुळे रक्त घेण्यास नकार देऊन म्हणते, "थोडा दूर हो, शिवशील" रक्ताचं नातं जोडू पाहणाऱ्या हणम्याच्या नशिबी अस्पृश्यतेमुळे आलेली अवहेलना दिसून येते. याच कथेत नायकाची आई महार जातीबद्दल कुत्सित भावनेने निषेध व्यक्त करताना म्हणते, "तू त्या महाराच्या पोराला घरात आणलास, देव-धर्म बाटवलास. ती पीडाच मी भोगतोय. यातून माझी सुटका नाही. मी मेले तरी हरकत नाही. पण महाराचं रक्त माझ्या शरीरात नको जायला." हणम्याच्या घरात येण्याने देव-धर्म बाटला व त्याचा परिणाम म्हणून नायकाची आई आजारी पडली असा मोठा अस्पृश्यतेचा आरोप हणम्यावर लादला जातो. हणम्याच्या वडिलांचीदेखील अवस्था कुत्र्या-मांजरासारखीच असल्याचे 'जात' या कथेत दिसून येते.

'नागफणा' या कथेत कोंड्या महाराचे चित्रण येते. सवर्णांनी कोंड्या महाराच्या सगळ्या पिढ्यांना पाळीव कुत्र्याप्रमाणे वागवलेले आहे. कोंड्या हा सवर्णांच्या घरातील कुत्रा बनून राहतो. सवर्ण समाजाच्या मानसिकतेचे प्रतीक म्हणून नायकाचे आजोबा या कथेत येतात. आजोबा सनातनी प्रवृत्तीचे आहेत. आजोबांना महाराने शिवले तर विटाळ होतो. नायकाची तहान भागविण्यासाठी कोंड्या महार विहिरीत उतरतो हे आजोबा बघतात. कोंड्या महाराने विहीर बाटवली म्हणून आजोबा त्याला चाबकाने फोडून काढतात. महारांच्या स्पर्शाने लक्ष्मी पळून जाईल. महार अमंगळ असतो अशी आजोबांची महार समाजाकडे पाहण्याची मानसिकता आहे. सनातनी आजोबांनी याच कोंड्याला सत्तेच्या स्वार्थापोटी राखीव मतदार संघासाठी पाटलांनी उभे केले इतकेच नाही, महार असणाऱ्या कोंड्याच्या प्रतिस्पर्धी असणाऱ्या दौल्याचा खून केला आणि केवळ आपल्या स्वार्थासाठी कोंड्याला निवडून आणले.

वंशपरंपरेतून अंधश्रद्धेच्या जबर तडाख्याने महारांना व्यवस्थेने 'पोतराज' केले. या पोतराजाच्या दुहेरी अस्पृश्यतेची करूण कहाणी 'चट्टा' कथेत येते. पोतराज असणाऱ्या यल्ल्याला महारोग होतो म्हणून त्याला हागणदारीत राहवे लागते. यल्ल्याच्या वासनेला बळी पडलेल्या कचरूच्या वाट्यालाही महारोगी जीवन येते. परंपरेने कचरूला पोतराजपणाची देणगीही दिली आणि अनुवंशिकतेने महारोगाचा चट्टाही दिला. महारोगी जीवनाचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रण शरणकुमार लिंबाळे यांनी केले आहे.

'सूर्यफूल' भुकेचा आगडोंब उसळलेल्या एका पशुची ही कथा आहे. जो आपले माणूसपण जपण्यासाठी काशीला आईची हाडे समर्पित करण्याऐवजी ती हाडे तो पशुंच्या हाडांसोबत विकून मोकळा होतो. 'सोनी' ही वेश्या आहे. या कथेतल्या सोनीच्या आईची अखेर वाचकांना सुन्न करणारी आहे. या कथेतील त्रिमुख मांग जातीतील नायक आहे. म्हणजेच तो दलित आहे. पाटील त्रिमुखच्या आईबरोबर शरीरसंबंध ठेवतो. शरीरसंबंध ठेवताना पाटलास तिचा विटाळ होत नाही. मात्र तिला त्याच्या पासून दिवस गेल्यानंतर मात्र पाटील तिची कायमचीच विल्हेवाट लावून देतो. त्रिमुख याच बलात्कारीत स्त्रिचे अपत्य 'मी मांग आहे' या एका भावनेने त्याला लाचार बनविले आहे. पाटलाच्या वाड्यातील कुत्रे त्यावर भुंकते. कुत्र्याचे भुंकणे म्हणजेच सवर्णाचे घर त्याला नाकारते. त्रिमुखचे लाचार जिणे त्याच्या चेहऱ्यावर सत्तर पिढ्यांची नम्रता विटाळशीगत उभी असलेली आहे. सूर्य डोक्यावर तळपताना, त्याची सावली त्याच्या पायात घुटमळत असताना त्याला आईची हाडे विसर्जित करण्यासाठी अनवाणी पायाने कधीच न पाहिलेल्या काशीला जाण्यासाठी बाहेर पडावे लागते. वाटेत भूक शमविण्यासाठी त्रिमुखला हाडे विकावी लागतात. म्हणून या ठिकाणी भाष्य करताना लिंबाळे म्हणतात, जनावरांच्या हाडांचे वजन कमी पडते म्हणून शारजाची हाडे त्यात टाकली. पशुपेक्षाही भयंकर जिणे त्रिमुखच्या वाट्याला आले आहे. त्यातच जात त्रिमुखची सतत आडवी येते. जातीने त्याला पूर्णपणे पोखरले आहे. या कथेतला संघर्ष एकपदरी नाही. शरणकुमार लिंबाळे यांच्या अनेक कथांपैकी एक चांगली कथा म्हणून या कथेचा उल्लेख करता येईल.

जातपरंपरेने 'येसकराची भाकर' मिळालेल्या आणि त्याच्या मोबदल्यात मिळालेले अस्पृश्य जीवन याचे चित्रण प्रस्तुत कथेत आलेले आहे. रात्रभर थंडी पावसात जागून गावाची राखण करायची, त्या मोबदल्यात गाव मागून खावा लागतो. चुकून कुणाच्या घरी चोरी



PRINCIPAL
Lokneta Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri.415203

झाली तर त्याचे सारे बालंट येसकरावर येते. पाटील त्याला भरमसाठ चोप देतो. चोरीचा तपास न लागल्यामुळे नामा मांग आत्महत्या करतो. येसकरीतून वाट्याला आलेले भयाण जीवन नामा मांगाच्या रूपाने या कथेत आले आहे. अशाप्रकारे 'दलित ब्राह्मण'या कथासंग्रहामध्ये जातीयतेचे, अस्पृश्यतेचे चित्रण आलेले आहे.

गावकुसाबाहेरील अस्पृश्य समाज शिक्षणाच्या, प्रगतीच्या अभावामुळे रूढी, परंपरा व अंधश्रद्धेच्या कचाट्यात आजही सापडलेला दिसतो. आपल्या दिशाहीन, सैरभैर जगण्याला दैववादाची नाळ जोडताना दिसतो. याचे प्रत्यंतर 'दलित ब्राह्मण'या कथासंग्रहात येते 'दलित ब्राह्मण' मधील कथांतील बरीच पात्रे ही दैववादी प्रवृत्तीची आढतात. त्यातून रूढी, परंपरेच्या नादाला लागून अंधश्रद्धा निर्माण झालेली दिसते. अज्ञान हे त्यामागील प्रमुख कारण सांगता येईल. या कथासंग्रहातील बरीच पात्रे रूढी, परंपरा व अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली दिसतात.

'धडका' या कथेत महार समाजातील रूढी, परंपरा व अंधश्रद्धेचे दर्शन घडते. गावात पाप जास्त झाले म्हणून दुष्काळ, रोगराई पसरली अशी समजूत आहे. यासाठी महाराच्या मेसुबायला (देवी) 'धडका' देण्याचा नवस बोलला जातो. जो जोराची धडक घेईल त्याला मेसुबाय पावते. घरात, गावात सुख नांदते, देवी खूष होते. मग कोणालाही काही कमी पडत नाही. धडक दिल्यानंतर निघालेल्या रक्ताचा नैवेद्य मेसुबायला दाखवला की मोसुबाय नवसाला पावते. अशी महार समाजात प्रथा आहे. यासाठी गावात मोठ्या धामधुमीने जत्रा भरविली जाते. या जत्रेत धडका मारून नवस फेडला जातो. धडका घेताना अनेकांना प्राणाला मुकावे लागलेले असतानाही असा प्राण जाणे म्हणजे देवीच्या चरणाजवळ जीव गेल्याचा आनंदही ते व्यक्त करतात. समाजाच्या वास्तवाचे चित्रण करीत असताना बदलत्या मानसिकतेचे व्दंव्द लिंबाळे नेमकेपणाने पकडतात. याचे प्रत्यंतर 'धडका' या कथेत येते.

'काळोखगर्भ' या कथेचा नायक अशिक्षित जन्माने दलित आहे. रोज मजुरी करणाऱ्या या दलिताला एके दिवशी एक धक्कादायक माहिती मिळते, आणि त्याच्या शांत जगण्याचे वणव्यात रूपांतर होते. वाडा बांधण्यासाठी म्हणून गावच्या पाटलाने त्याच्या आईचा नरबळी दिलेला होता आणि तोही ती गरोदर असताना. त्यामुळे त्याच नारायण पाटलाची गरोदर मुलगी जेव्हा माहेरी येते. तेव्हा सूडाने पेटलेला बळी तिला ठार करण्याचा निर्णय घेतो, पण त्याच्या बेभान मनासही आवर घालणारा त्याच्यातला माणूस जागा होतो. कुऱ्हाडीचे घाव वर्षाच्या शरीरावर पडत नाहीत. तो फक्त चिरेबंद वाड्यात घरंदाज दरवाजावर एकामागून एक घाव घालतो. अशा काळोखातून बळीसारखा सुसंस्कृत माणूस जन्माला येणे, हे या कथेचे मध्यवर्ती सूत्र आहे.

'चट्टा' ही कथा कुष्ठरोगी नायकाची आहे. बाप मेल्यावर चार वर्षाने तो जन्माला आलेला आहे. अवघ्या एका वाक्यात अतिशय भेदक असे त्याच्या जन्माचे वास्तव लेखकाने चित्रित केले आहे. खरेतर रोगग्रस्त माणसाच्या शरीरातले वासनांचे तांडव या कथेत आलेले आहे. या कथेत यल्ल्या आणि निवेदक हे रूढी, परंपरेचे व अंधश्रद्धेचे बळी पडलेले आहेत. 'पोतराज'' परंपरा ही घराण्याने पुढे चालवायची असते नाहीतर देवीचा कोप होतो. अशी समजूत आहे. यल्ल्याला झालेला तसेच आपल्या मुलाला झालेला महारोग हा देवीचाच कोप असल्याची अंधश्रद्धा बाळगणारी माणसे या कथेत येतात. निवेदकाची आई महारोगाचे व अंधश्रद्धेचे समर्थन करताना म्हणते, "देवीचा रोग हाय, आमच्या हातनं काय तर चुकलं आशील.आमी नवस मागून घितलाव. माझा ल्योक पोतराज हाय. माय लक्ष्मीबाय बरं करील माझ्या लेकाचं. तिनं का डोळं झाकून बसलीय? माझा ल्योक तिची सेवा करतूया," या विचारामधून तिच्या मनातील रूढी, परंपरेचे व अंधश्रद्धेच्या मनोवृत्तीचे दर्शन घडते. भारतीय समाजव्यवस्थेतील तळातील अस्पृश्य समाज व्यवस्थेपासून तुटला गेलेला असल्यामुळे अनेक समस्यांनी तो ग्रासलेला आहे. त्यांच्या राहणीमानात कमालीचा दैववाद व अंधश्रद्धा दिसून येते. याचे प्रातिनिधिक चित्रण 'दलित ब्राह्मण' या कथासंग्रहातून शरणकुमार लिंबाळे यांनी घडविले आहे. समाज वास्तवातून सामोरे जात असताना परिणामांची कारणे तपासत शहानिशाही करताना दलित तरूण दिसतो.



PRINCIPAL
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri

झाली तर त्याचे सारे बालंट येसकरावर येते. पाटील त्याला भरमसाठ चोप देतो. चोरीचा तपास न लागल्यामुळे नामा मांग
आत्महत्या करतो. येसकरीतून वाट्याला आलेले भयाण जीवन नामा मांगाच्या रूपाने या कथेत आले आहे. अशाप्रकारे 'दलित
ब्राह्मण'या कथासंग्रहामध्ये जातीयतेचे, अस्पृश्यतेचे चित्रण आलेले आहे.
गावकुसाबाहेरील अस्पृश्य समाज शिक्षणाच्या, प्रगतीच्या अभावामुळे रूढी, परंपरा व अंधश्रद्धेच्या कचाट्यात आजही सापडलेला
दिसतो. आपल्या दिशाहीन, सैरभैर जगण्याला दैववादाची नाळ जोडताना दिसतो. याचे प्रत्यंतर 'दलित ब्राह्मण'या कथासंग्रहात येते
'दलित ब्राह्मण' मधील कथांतील बरीच पात्रे ही दैववादी प्रवृत्तीची आढतात. त्यातून रूढी, परंपरेच्या नादाला लागून अंधश्रद्धा
निर्माण झालेली दिसते. अज्ञान हे त्यामागील प्रमुख कारण सांगता येईल. या कथासंग्रहातील बरीच पात्रे रूढी, परंपरा व
अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली दिसतात.
'धडका' या कथेत महार समाजातील रूढी, परंपरा व अंधश्रद्धेचे दर्शन घडते. गावात पाप जास्त झाले म्हणून दुष्काळ, रोगराई
पसरली अशी समजूत आहे. यासाठी महाराच्या मेसुबायला (देवी) 'धडका' देण्याचा नवस बोलला जातो. जो जोराची धडक घेईल
त्याला मेसुबाय पावते. घरात, गावात सुख नांदते, देवी खूष होते. मग कोणालाही काही कमी पडत नाही. धडक दिल्यानंतर
निघालेल्या रक्ताचा नैवेद्य मेसुबायला दाखवला की मोसुबाय नवसाला पावते. अशी महार समाजात प्रथा आहे. यासाठी गावात
मोठ्या धामधुमीने जत्रा भरविली जाते. या जत्रेत धडका मारून नवस फेडला जातो. धडका घेताना अनेकांना प्राणाला मुकावे
लागलेले असतानाही असा प्राण जाणे म्हणजे देवीच्या चरणाजवळ जीव गेल्याचा आनंदही ते व्यक्त करतात. समाजाच्या वास्तवाचे
चित्रण करीत असताना बदलत्या मानसिकतेचे व्दंव्द लिंबाळे नेमकेपणाने पकडतात. याचे प्रत्यंतर 'धडका' या कथेत येते.
'काळोखगर्भ' या कथेचा नायक अशिक्षित जन्माने दलित आहे. रोज मजुरी करणाऱ्या या दलिताला एके दिवशी एक धक्कादायक
माहिती मिळते, आणि त्याच्या शांत जगण्याचे वणव्यात रूपांतर होते. वाडा बांधण्यासाठी म्हणून गावच्या पाटलाने त्याच्या आईचा
नरबळी दिलेला होता आणि तोही ती गरोदर असताना. त्यामुळे त्याच नारायण पाटलाची गरोदर मुलगी जेव्हा माहेरी येते. तेव्हा
सूडाने पेटलेला बळी तिला ठार करण्याचा निर्णय घेतो, पण त्याच्या बेभान मनासही आवर घालणारा त्याच्यातला माणूस जागा
होतो. कुऱ्हाडीचे घाव वर्षाच्या शरीरावर पडत नाहीत. तो फक्त चिरेबंद वाड्यात घरंदाज दरवाजावर एकामागून एक घाव घालतो.
अशा काळोखातून बळीसारखा सुसंस्कृत माणूस जन्माला येणे, हे या कथेचे मध्यवर्ती सूत्र आहे.
'चट्टा' ही कथा कुष्ठरोगी नायकाची आहे. बाप मेल्यावर चार वर्षाने तो जन्माला आलेला आहे. अवघ्या एका वाक्यात अतिशय
भेदक असे त्याच्या जन्माचे वास्तव लेखकाने चित्रित केले आहे. खरेतर रोगग्रस्त माणसाच्या शरीरातले वासनांचे तांडव या कथेत
आलेले आहे. या कथेत यल्ल्या आणि निवेदक हे रूढी, परंपरेचे व अंधश्रद्धेचे बळी पडलेले आहेत. 'पोतराज' परंपरा ही
घराण्याने पुढे चालवायची असते नाहीतर देवीचा कोप होतो. अशी समजूत आहे. यल्ल्याला झालेला तसेच आपल्या मुलाला
झालेला महारोग हा देवीचाच कोप असल्याची अंधश्रद्धा बाळगणारी माणसे या कथेत येतात. निवेदकाची आई महारोगाचे व
अंधश्रद्धेचे समर्थन करताना म्हणते, ''देवीचा रोग हाय, आमच्या हातनं काय तर चुकलं आशील.आमी नवस मागून घितलाव.
माझा ल्योक पोतराज हाय. माय लक्ष्मीबाय बरं करील माझ्या लेकाचं. तिनं का डोळं झाकून बसलीय? माझा ल्योक तिची सेवा
करतूया,'' या विचारामधून तिच्या मनातील रूढी, परंपरेचे व अंधश्रद्धेच्या मनोवृत्तीचे दर्शन घडते. भारतीय समाजव्यवस्थेतील
तळातील अस्पृश्य समाज व्यवस्थेपासून तुटला गेलेला असल्यामुळे अनेक समस्यांनी तो ग्रासलेला आहे. त्यांच्या राहणीमानात
कमालीचा दैववाद व अंधश्रद्धा दिसून येते. याचे प्रातिनिधिक चित्रण 'दलित ब्राह्मण' या कथासंग्रहातून शरणकुमार लिंबाळे यांनी
घडविले आहे. समाज वास्तवातून सामोरे जात असताना परिणामांची कारणे तपासत शहानिशाही करताना दलित तरूण दिसतो.



Lokneta Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri 415203

फायदा करून घ्यावयाचा असतो. विषम भारतीय जातीव्यवस्थेने दलितांवर हजारो वर्षांपासून गुलामगिरी लादून कुत्र्यामांजरासारखे जगायला भाग पाडले, मुंगीला साखर घालून, गाढवाला गंगा पाजली मात्र दलितांना ओंजळभर पाण्यापासून वंचित ठेवले. गोमूत्र पवित्र तर अस्पृश्यांचा स्पर्श अपवित्र मानला. 'हे विश्वचि माझे घर' मानून अस्पृश्यांना मात्र गावकुसाबाहेर जगण्यास भाग पाडले अशा दाहकतेचे चित्रण 'अनुत्तर' ही कथा घडविते. दलित जीवन, त्यांच्या जगण्यातील जीवघेणा संघर्ष, दारिद्रय या भीषण वास्तवाचे दर्शन 'देवमाणूस' ही कथा घडविते. घरातील कर्ता माणूस सावकाराच्या अत्याचाराला बळी पडतो, आणि त्याच्या कुटुंबाची वाताहत होते. पोटात भडकलेली भूक भागविण्यासाठी चोरी, लबाडी करावी लागते. कुत्र्याच्या तोंडातील भाकरीचा तुकडा हिसकावून आपली भूक शमवावी लागते. दारिद्रयामध्ये जीवन जगणाऱ्या दलित समाजाच्या हीनदीन अवस्थेचे प्रत्यंतर या कथेतून येते. सावकाराच्या रेड्याला कणीस देऊन मारले म्हणून संपूर्ण महारांना सावकार वेठीस धरतो. त्यांना खांबांना बांधून मरणाचा मार दिला जातो.

सामाजिक विषम व्यवस्था दलितांना जगू देत नाही. सामाजिक भीषण वास्तवाचा अनुभव 'रथयात्रा' मधील सर्वच कथा कमीअधिक प्रमाणात देतात. परंपरेच्या आहारी गेलेला महार समाजाचे महारपण 'जोहार' या कथेत आले आहे. विठ्ठलाचा महार, संताधरचा महार, पाटलाचा महार अशी महारांची वर्षानुवर्षांची दास्याची परंपरा खंडित होऊ शकत नाही. हलकी कामे, काळ बदलला तरी टळू शकत नाहीत. याचे वैषम्य लिंबाळे 'जोहार' या कथेत मांडतात. महारांनी मेलेले जनावर ओढायला नकार देताच अहंकार दुखावला गेल्यामुळे गाव दलितांच्या झोपड्या जाळतात. महार समाज बौध्द धम्माचा स्वीकार करतो. त्यांना स्वातंत्र्य मिळाले. हक्क मिळूनसुध्दा त्यांच्या भाकरीचा प्रश्न अजूनही अनिर्णित आहे, याचे दर्शन या कथेत घडवण्यात आले आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता असे महान संस्कार घडविणाऱ्या विद्येच्या मंदिरामध्ये, शाळा- महाविद्यालयामध्ये जातीयता कशी पाळली जाते याचे चित्रण 'सुधा डियर' या कथेत येते. हजारो वर्षापासून वर्णव्यवस्थेने अस्पृश्य समाजाला जे हीन जगणे जगायला भाग पाडले त्याबद्दलचा संताप 'समाधी' या कथेत प्रकट होतो. संतापी नायक देवा-धर्माचा आधार घेऊन माणसामाणसांत उच्च-नीचता पसरविणाऱ्या वृत्तीचा निषेध करतो. मंदिरामधील परमेश्वर हा दगडाचा आहे तो संवेदनाहीन आहे. त्याबद्दल विचार व्यक्त करताना नायक म्हणतो, ''भडव्यानो, दगडाचे किती स्तोम माजवणार आणि माणसांना किती नाकारणार ?''



Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri.415203